# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
# Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere
(Established by Government of Maharashtra and Governed by Dr. Babasaheb Ambedkar Technological University Act No. XXIX of 2014)
विद्याविहार, लोणेरे-रायगड ४०२ १०३ (महाराष्ट्र) Vidyavihar, Lonere - Raigad 402 103 (Maharashtra)
Tel: (02140) 275142 Student Helpline: 02140 - 275212
Website: www.dbatu.ac.in, E-mail: registrar@dbatu.ac.in

**Dr. Bhagawan F. Jogi** — डॉ. भगवान फ. जोगी
**Registrar** — कुलसचिव


क्र. डॉबाआंतंवि/कुलसचिव कार्यालय/२०२२/ ३३९ — दिनांकः २८/०२/२०२२

अतितात्काळ/अत्यंत महत्वाचे

**कार्यालयीन आदेश**

विषयः विद्यापीठातील नियमित वर्ग सुरु करणेबाबत

संदर्भः
१ जिल्हाधिकारी रागयड अलिबाग यांचे पत्र क्र. साशा/कार्य-१/ब-५/परवानगी/२०२१ दि. १४/०२/२०२२ रोजीचे दिनांक २८/०२/२०२२ रोजी प्राप्त झालेले पत्र
२ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण२०२१/प्र.क्र.६/विशि-३, दि. १३/१०/२०२१
३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे शासन पत्र क्र. युएनआय/(८२/२१)/विशि-१/भाग-२/ १२३४ दि. ०९/०२/२०२१
४ विश्वविद्यालय अनुदान आयोग यांचे पत्र क्र. F.No. 14-8/2020(CPP-II) dt. 11/02/2022
५ विद्यापीठाचे परिपत्रक क्र. डॉबाआंतंवि/कु.का./वसतीगृहे/२०२२/२८६, दि. ११/०२/२०२२

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमधील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत सुचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार विद्यापीठ व इन्स्टिटयुट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरिंग तसेच संलग्नित महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, दिनांक ०२/०३/२०२२ पासून ऑफलाईन पध्दतीने नियमित वर्ग सुरु करण्याची कार्यवाही करुन सबंधीत विभाग प्रमुखांनी/संस्था प्रमुखांनी विद्यार्थ्यांना या बाबत कळविण्याची कार्यवाही करुन दिनांक ०२/०३/२०२२ पासून नियमित वर्ग सुरु करावे व त्याबाबतचा अहवाल तात्काळ निम्नस्वाक्षरीकरांना सादर करावा.

28-02-2022

(डॉ. बी. एफ. जोगी)
कुलसचिव
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ
लोणेरे ता.माणगांव जि.रायगड ४०२१०३

प्रति,
१ सर्व विभाग प्रमुख / विभाग नियंत्रक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
२ प्राचार्य, इन्स्टिटयुट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरिंग लोणेरे
३ प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये
४ सुचना फलक व संकेतस्थळावर- विद्यार्थ्यांकरीता

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग
हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
दुरध्वनी क्र. ०२१४१/२२२११८ फॅक्स क्र. ०२१४१/२२७४५१, Email: dcraigad@gmail.com

(सामान्य शाखा) क्र.साशा/कार्या-१/ब-५/परवानगी/२०२१ 926 दि. १५/०२/२०२२

प्रति,
कुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,
लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड

**विषय:- विद्यापीठ व संलंग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करणेबाबत.**

संदर्भ:- १. आपलेकडील पत्र क्र.डॉ.बाआंतवि/आस्था/कोविड-१९/२०२२/४७ दि.११/०२/२०२२ चे पत्र
२. शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील परिपत्रक क्र.संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि-३ दि.२५/०१/२०२२
३. या कार्यालयाकडील पत्र क्र.साशा/कार्या-१/ब-५/कोरोना विषाणू/प्रति. उपा./२०२२ (आदेश क्र. ५९०/२०२२) दि.३१/०१/२०२२

आपण या कार्यालयाकडे संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये महाविद्यालये व वसतीगृहे सुरु करण्याबाबत नियमावली (Standing Operating Procedure) असल्यास ती या विद्यापीठास उपलब्ध करुन द्यावी व विद्यापीठ तसेच वसतीगृह नियमित सुरु करण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते कि, शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील परिपत्रक दि.२५/०१/२०२२ मध्ये देण्यात आलेल्या निर्देशानुसार या कार्यालयामार्फत संदर्भिय २ कडील आदेशानुसार रायगड जिल्ह्याच्या हद्दीतील अकृषी विद्यापीठे, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणीक संस्थांमधील नियमित वर्ग दि.१ फेब्रुवारी, २०२२ पासून प्रत्यक्षरित्या ऑफलाईन पध्दतीने अटी व शर्तीच्या अधिन राहून सुरु करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सदरच्या आदेशा मधील मुद्दा क्र.५ मधे वसतीगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करण्याबाबत संबंधित विद्यापीठाने संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र पुणे व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी असे नमुद करण्यात आले आहे. सोबत या कार्यालयाकडील दि.३१/०१/२०२२ रोजीच्या आदेशाची प्रत जोडण्यात येत आहे. तरी त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यावाही करावी.

आवक क्र. 72
दिनांक 28/02/2022
सही

(डॉ.पदमश्री बैनाडे)
निवासी उपजिल्हाधिकारी
रायगड अलिबाग

आदेश क्र.५९०/२०२२

महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग**

हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

दुरध्वनी क्र.०२१४१/२२२११८ फॅक्स क्र.०२१४१/२२७४५१, Email: tahasildargadraigad@gmail.com

**(सामान्य शाखा)** **क्र.साशा/कार्या-१/ब-५/कोरोना विषाणू/प्रति.उपा./२०२२** **दि.३१/०१/२०२२**

वाचले :- १) साथरोग अधिनियम १८९७

२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४.

३) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

४) शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.कोरोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०.

५) शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.कोरोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.

६) शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील परिपत्रक क्र.संकीर्ण २०२१/प्र. क्र.६/विशि-३ दि.०७/०१/२०२२

७) या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/कोविड-१९/प्रति.उपा/२०२२, दि.०८/०१/२०२२ (कोरोना आदेश क्र.५८३/२०२१)

८) शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/ प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दि.०८/०१/२०२२

९) शासन, महसूल व वन,आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/ प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दि.०९/०१/२०२२

१०) या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/कोविड-१९/प्रति.उपा/२०२१.दि.०९/०१/२०२२ (कोरोना आदेश क्र.५८५/२०२१)

११) शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील परिपत्रक क्र.संकीर्ण २०२१/प्र. क्र.६/विशि-३दि.२५/०१/२०२२

१२) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दि.३१/०१/२०२२.

---

**आदेश :-**

ज्याअर्थी, शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपोद्घातांतील अ.क्र.४ कडील अधिसूचनेद्वारे साथरोग अधिनियम, १८९७ मधील खंड २, ३, व ४ ची अंमलबजावणी राज्यात सदर अधिसूचनेच्या प्रसिध्दी दिनांका पासून सुरु करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील उपोद्घातांतील अ.क्र.०६, ०८ कडील आदेशाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील उपोद्घातांतील अ.क्र.०८, ०९ अन्वये अधिसूचना जारी करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील उपोद्घातांतील अ.क्र.०६ दि.०७/०१/ २०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील उपोद्घातांतील अ.क्र.०७ दि.०८/०१/२०२२ रोजीच्या आदेशान्वये रायगड जिल्ह्यातील सर्व अकृषीक विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न

महाविद्यलयातील वर्ग प्रत्यक्ष ऑफलाईन पध्दतीने न घेता दि.१५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने सुरु ठेवण्याच्या सूचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव राज्याच्या सर्व भागात सारख्या प्रमाणात नसल्याने व राज्यातील ज्या ठिकाणी कोरोनाचा प्रादुर्भाव कमी आहे अश्या भागातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करण्याबाबत स्थानिक स्तरावरुन मागणी असल्याने, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापिठे, स्वयंअर्थसाहय्यित विद्यापिठे, समुह विद्यापिठे, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणीक संस्थांमधील नियमित वर्ग दि.१ फेब्रुवारी, २०२२ पासून प्रत्यक्षरित्या ऑफलाईन पध्दतीने सुरु करण्यास शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील उपोद्घातांतील अ.क्र.११ दि.२५/०१/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, मी, डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड मला साथरोग अधिनियम, १८९७ आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये प्राप्त अधिकारातून रायगड जिल्ह्याच्या हद्दीतील अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापिठे, स्वयंअर्थसाहय्यित विद्यापिठे, समुह विद्यापिठे, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणीक संस्थांमधील नियमित वर्ग दि.१ फेब्रुवारी, २०२२ पासून प्रत्यक्षरित्या ऑफलाईन पध्दतीने सुरु करण्यास खालील मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्याचे अटी/शर्तीवर मान्यता देत आहे.

१) ज्यांनी कोविड-१९ च्या लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत, अशा विद्यार्थी / विद्यार्थीनींना विद्यापीठ व महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची परवानगी राहील. तथापि, लसीकरण (दोन्ही डोस) न झालेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, त्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) विद्यापीठे/महाविद्यालयांच्या दि.१५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत घेण्यात येणाऱ्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात याव्यात. तद्नंतर, घेण्यात येणाऱ्या परीक्षा ऑफलाईन/ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा. विजेची अनुपलब्धता किंवा नेटवर्क कनेक्टिव्हिटी नसल्यामुळे किंवा विद्यार्थी अथवा त्याचे कुटुंबीय कोरोना बाधित असल्यास किंवा आरोग्यविषयक इतर समस्यांमुळे विद्यार्थी परीक्षा देऊ शकला नाही तर अशा विद्यार्थ्यांची ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने पुनर्परीक्षा घेण्यात यावी. परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठांशी संलग्नित काही भागात नेटवर्क सेवा विस्कळीत असल्यास किंवा उपलब्ध नसल्यास या कार्यालयाची परवानगी घेऊन ऑफलाईन स्वरुपात या भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात याव्यात.

३) परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना येणाऱ्या संभाव्य अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी विद्यापीठे/महाविद्यालयांनी हेल्पलाईनची व्यवस्था करावी. परीक्षा व्यवस्थितरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी त्यांच्या संकेतस्थळावर परीक्षांचा अभ्यासक्रम, नमुना प्रश्नसंच, हेल्पलाईन नंबर, इत्यादी स्वयंस्पष्ट माहिती उपलब्ध करुन दयावी.

४) विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा.

५) वसतीगृहे टप्प्या - टप्प्याने सुरु करण्याबाबत संबंधित विद्यापीठाने संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी.

६) ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींनी कोविड-१९ ची लस घेतलेली नाही. त्यांच्याकरिता विद्यापीठाने संबंधित संस्थांचे प्रम… महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे मदतीने स्थानिक प्राधिकरणाशी समन्वय साधून लसीकरणासाठी विशेष मोहिम रा… लसीकरण प्राधान्याने पूर्ण करून घ्यावे. तसेच विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा… देखील लसीकरण प्राधान्याने करून घ्यावे त्याच प्रमाणे वय वर्षे १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांचे लसीकरण … प्राधान्याने करून घेण्यात यावे.

७) जिल्ह्यातील सुरु होणाऱ्या सर्व विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांनी कोविड-१९ च्या व्यवस्था… बाबतचे राष्ट्रीय निर्देश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेल्या मार्गद… तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केले… मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती/आस्थापना शासनाने यापूर्वी लागू केल्यानुसार दंडात्… कारवाईस तसेच भारतीय दंड संहिता कलम १८८, २६९, २७०, तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कल… ५१ सह अन्य तरतुदीनुसार फौजदारी शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दि.३१/०१/२०२२ रोजी दिलेला आहे.

सही/-XXX
(डॉ महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी.
प्रत :- मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांजकडे माहितीसाठी.
प्रत :- संचालक, उच्च शिक्षण संचलनालय महाराष्ट्र पुणे.
प्रत :- संचालक, तंत्र व शिक्षण संचलनालय महाराष्ट्र मुंबई.
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प. रायगड-अलिबाग यांजकडे माहितीसाठी.
प्रत :- आयुक्त, पनवेल महानगरपालीका, पनवेल यांजकडे माहितीसाठी.
प्रत :- पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांजकडे माहितीसाठी.
प्रत :- जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, राजिप, अलिबाग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड यांजकडे आवश्यक त्या उचित प्रसिध्दीसाठी.
प्रत :- शिक्षणाधिकारी, माध्यमिक/प्राथमिक, राजिप अलिबाग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- उपविभागीय अधिकारी (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- उपविभागीय पोलीस अधिकारी (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- तहसीलदार (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- पोलीस निरिक्षक, (सर्व) पोलीस ठाणे यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- मुख्याधिकारी नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

(डॉ.महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ

विद्याविहार लोणेरे - रायगड ४०२१०३ (महाराष्ट्र राज्य)

मान्यता : महाराष्ट्र शासन कायदा २०१४ चा २९

www.dbatu.ac.in registrar@dbatu.ac.in bfjogi@dbatu.ac.in


क्रमांकः डॉबाआंतंवि/आस्था/कोव्हिड-१९/२०२२/ ४८०

दिनांकः ११/०२/२०२२

प्रति
मा. जिल्हाधिकारी सो.
जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

**विषय** : विदयापीठ व संलग्नित महाविदयालयातील नियमित वर्ग सुरु करणेबाबत

**संदर्भ** : महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण२०२१/प्र.क्र.६/विशि-३, दिनांक २५/०१/२०२२

महोदय,

राज्यात वेगाने वाढत असलेल्या कोव्हिड-१९ व ओमायक्रॉनच्या रुग्णांची संख्या पाहता समूह संसर्गाचा धोका टाळण्यासाठी व रोगाचा फैलाव रोखण्यासाठी राज्यातील अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थांमधील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत दिनांक ०७/०१/२०२२ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सुचना प्राप्त झाल्या होत्या.

राज्यातील अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थां ज्या प्राधिकरण अंतर्गत येतात त्यांच्याशी या आजाराचा स्थनिक पातळीवर प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित प्रक्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेवून विद्यापीठे व महाविद्यालये ऑफलाईन पध्दतीने नियमित वर्ग दिनांक ०१/०२/२०२२ पासून सुरु करण्याबाबत उपरोक्त संदर्भान्वये सुचना प्राप्त झाल्या आहेत.

याप्रकरणी स्थानिक प्राधिकरणांची सहमती आवश्यक आहे. याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विदयार्थ्यांची कोव्हिड-१९ करीता टेस्ट बाबत आपण आरोग्य यंत्रणेला आवश्यक ते आदेश देण्याची विनंती आहे. तसेच महाविदयालये व वसतीगृहे सुरु करण्याबाबत नियमावली (Standing Operating Procedure) असल्यास ती या विद्यापीठास उपलब्ध करुन दयावी व विद्यापीठ तसेच वसतीगृहे नियमित सुरु करण्यास परवानगी दयावी ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. बी. एफ. जोगी)
कुलसचिव

कुलसचिव
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ
लोणेरे ता.माणगांव जि.रायगड ४०२१०३

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे रायगड महाराष्ट्र

प्रतः आवश्यक त्या कार्यवाहीकरीता

१ मा. उप विभागीय अधिकारी, माणगाव विभाग, माणगाव - रायगड

२ मा. तहसिलदार - तहसिल कार्यालय, माणगाव - रायगड

३ सर्व संलग्नित महाविदयालयांचे प्राचार्य (वरील संदर्भानुसार स्थानिक प्राधिकरणांची सहमती घेवून नियमीत वर्ग सुरु करण्याबाबत आवश्यक ती कार्यकवाही करावी)

प्रत : माहितीसाठी सविनय सादरः मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ

विद्याविहार लोणेरे - रायगड ४०२१०३ (महाराष्ट्र राज्य)
मान्यता : महाराष्ट्र शासन कायदा २०१४ चा २९
www.dbatu.ac.in registrar@dbatu.ac.in bfjogi@dbatu.ac.in

क्रमांकः डॉबाआंतंवि/कु.का./वसतीगृहे/२०२२/२८६
दिनांकः ११/०२/२०२२

## परिपत्रक

**विषयः** विद्यापीठातील वसतीगृहे सुरु करणेबाबत

**संदर्भ:** १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०६/विशि-३ दि. २०/१२/२०२१
२. विश्वविद्यालय अनुदान आयोग यांचे पत्र क्र. F.No.14-8/2020(CPP-II) dt. 11/02/2022

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्यातील अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्था ज्या प्राधिकरण अंतर्गत येतात त्यांच्याशी कोव्हिड-१९ व ओमायक्रॉन या आजाराचा स्थनिक पातळीवर प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित प्रक्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेवून विद्यापीठे व महाविद्यालये ऑफलाईन पध्दतीने नियमित वर्ग दिनांक ०१/०२/२०२२ पासून सुरु करण्याबाबतच्या सुचना प्राप्त झाल्या आहेत. त्याप्रमाणे कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामाच्या ठिकाणबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी दिलेली मार्गदर्शक तत्वे तसेच विद्यापीठ अनुदान आयोग व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहून उपरोक्त संदर्भान्वये वसतीगृहे सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन सर्व वसतीगृहे सुस्थितीत करुन ठेवण्याची तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. याबाबत शासनाकडून पुढील आदेश प्राप्त झाल्यांनतर विद्यार्थ्यांना वसतीगृह प्रवेश देण्याची व्यवस्था महाविद्यालयांचे प्राचार्य व वसतीगृह अधिक्षक यांनी करावी.

11.02.2022

(डॉ. बी. एफ. जोगी)
कुलसचिव

(डॉ.भ.फ.जोगी)
कुलसचिव
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ
लोणेरे ता.माणगांव जि.रायगड ४०२१०३

प्रति
०१ प्राचार्य, इन्स्टिटयुट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरिंग लोणेरे
०२ प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये
०३ मुख्य वसतीगृह अधिक्षक
०४ सर्व वसतिगृह अधिक्षक
०५ सर्व सहाय्यक वसतीगृह अधिक्षक

**प्रतः** माहितीकरीता सविनय सादर
मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांचे कार्यालय

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

प्रो. रजनीश जैन
सचिव

**Prof. Rajnish Jain**
**Secretary**

सत्यमेव जयते

विश्वविद्यालय अनुदान आयोग
**University Grants Commission**
(शिक्षा मंत्रालय, भारत सरकार)
(Ministry of Education, Govt. of India)
बहादुरशाह ज़फ़र मार्ग, नई दिल्ली-110002
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002
Ph.: 011-23236288/23239337
Fax : 011-2323 8858
E-mail : secy.ugc@nic.in

**11th February, 2022**

**F.No. 14-8/2020(CPP-II)**

**Subject : Re-opening of Universities and Colleges Post Lockdown due to COVID-19 Pandemic**

Respected Madam/Sir,

Since the outbreak of COVID-19 Pandemic in the country, the University Grants Commission (UGC) has been constantly monitoring the academic activities in Higher Education Institutions affected by pandemic and has issued appropriate guidelines from time to time in respect of Academic Calendar, Examinations, Re-opening of institutions, Standard Operating Procedures (SOPs) for conduct of examinations in view of COVID-19 Pandemic and subsequent lockdowns. All the guidelines / advisories issued by the UGC in this regard on 29.04.2020, 06.07.2020, 08.07.2020, 24.09.2020, 05.11.2020, 16.07.2021 and 13.12.2021 are available on UGC website www.ugc.ac.in.

The Ministry of Health and Family Welfare vide its D.O. No. MoHFW/COVID19/Edu.Inst-2021 dated 10.12.2021 has requested to ensure strict enforcement of COVID Appropriate Behaviour at all times and at all places in universities, colleges and other institutes of Higher Education.

Keeping in view the situation of COVID-19 in their respective region, the HEIs may open campuses; conduct classes and examinations in offline / online / blended mode following COVID Appropriate Behavior and necessary protocols/guidelines/directions/advisories issued by the Central/State Governments or competent authorities from time to time.

With kind regards,

Yours sincerely,

**(Rajnish Jain)**

**<u>The Vice-Chancellors of All Universities</u>**

महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय

मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

www.dhepune.gov.in E-mail- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक- युएनआय/(८२/२१)/विशि-१/भाग-२ / १२३४ दिनांक- 09 FEB 2022

अतितात्काळ

प्रति,

मा.कुलगुरु,
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय विद्यापीठ/महाविद्यालयातील वसतिगृहे सुरु करणेबाबत.**

संदर्भ- १.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण२०२१/ प्र.क्र.६/विशि-३ दिनांक १३ ऑक्टो, २०२१
२.शासन पत्र क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०६/विशि-३ दि.२० डिसेंबर, २०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय पत्र कृपया पहावीत.

वरील संदर्भिय शासन निर्णयात नमूद केलेल्या मुद्दा क्रमांक ६ मध्ये वसतिगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण यांनी आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी असे नमूद केलेले आहे.

त्यानुसार आपण आपल्या विद्यापीठांतर्गत असलेल्या सर्व जिल्हयाचे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख म्हणून मा.जिल्हाधिकारी महोदयांशी यासंदर्भात चर्चा करुन कोविड -१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामांच्या ठिकाणाबाबतचे अतिरिक्त निदेश राज्य शासनाने वेळोवेळी दिलेली मार्गदर्शक तत्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील जी वसतिगृहे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या ताब्यात आहेत व

सुस्थितीत आहेत अशी आपल्या विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयातील वसतिगृहे सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

(डॉ.प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**प्रत- माहितीस्तव सादर**

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३.स्वीय सहाय्यक, मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी**

१.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई
२.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID - hted.vishi3-mh@gov.in

क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र. क्र.०६/विशि-३ दिनांक : २० डिसेंबर, २०२१.

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

विषयः- विद्यापीठ/ महाविद्यालयातील वसतिगृहे सुरु करणेबाबत.
संदर्भः- आपले पत्र क्र.युएनआय/(८२/२१)/विशि-१/भाग-२/१३५२४,
दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी लसीचे दोन डोस घेतले आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता, कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी दिलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील जी वसतीगृहे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या ताब्यात आहेत व सुस्थितीत आहेत अशी वसतीगृहे सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यास अनुसरुन आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

आपला,

(अ.म.बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १३ ऑक्टोबर, २०२१

प्रस्तावनाः-

राज्यातील ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १२ वी व शहरी भागात इयत्ता ८ वी ते १२ वी चे वर्ग दि. ०४ ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यात आले आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थी हे १८ वर्षांवरील असून बहुतेक विद्यार्थ्यांचे लसीकरण झाले असण्याची शक्यता आहे. तसेच, राज्यातील कोव्हिड-१९ बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झालेली असून सद्यस्थितीत ही साथ नियंत्रणाखाली आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये कोव्हिड प्रतिबंधात्मक सर्वसाधारण उपाययोजना करुन विद्यार्थ्यांकरिता ऑफलाईन पध्दतीने नियमित वर्ग सुरु करणे विद्यार्थ्यांच्या हिताचे राहील. सबब, राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रकः-

१. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, विद्यापीठ/महाविद्यालयांचे वर्ग ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेने सुरु करण्याबाबत स्थानिक प्राधिकरणांशी विचारविनिमय करुन विद्यापीठांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

२. १८ वर्षावरील विद्यार्थी ज्यांनी कोव्हिड-१९ च्या लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत, तेच विद्यार्थी/विद्यार्थीनी विद्यापीठ व महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहू शकतील.

३. प्रतिबंधित प्रक्षेत्रात येणारी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये ही ज्या आयुक्त, महानगरपालिका/ नगरपालिका किंवा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे अंतर्गत येतात, त्यांच्याशी कोव्हिड-१९ च्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित प्रक्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेऊन, विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करण्याबाबत विचारविनिमय करुन योग्य तो निर्णय संबंधित

विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर घ्यावा व त्यानुसार महाविद्यालयांना सविस्तर मार्गदर्शक सूचना/ मानक कार्य प्रणाली (एसओपी) देण्यात यावी.

४. राज्यातील सुरु होणाऱ्या सर्व विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांनी कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

५. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, त्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

६. वसतीगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

७. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींनी कोव्हिड-१९ ची लस घेतलेली नाही, त्यांच्याकरिता विद्यापीठाने संबंधित संस्थांचे प्रमुख/ महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे मदतीने स्थानिक जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून लसीकरणासाठी विशेष मोहिम राबवून लसीकरण प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे. तसेच विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे देखील लसीकरण प्राधान्याने करुन घ्यावे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२११०१३१६४६०१५५०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Pravinkumar Gulabrao Pawar

(प्रविणकुमार पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

७. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
११. कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे
१२. कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
१३. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
१४. कुलगुरु, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
१५. कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१६. सर्व महानगरपालिका आयुक्त
१७. सर्व जिल्हाधिकारी
१८. प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे
२०. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
२१. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
२२. निवडनस्ती (विशि-३).

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID - hted.vishi3-mh@gov.in


क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र. क्र.०६/विशि-३ दिनांक : २० डिसेंबर, २०२१.

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

विषयः- विद्यापीठ/ महाविद्यालयातील वसतिगृहे सुरु करणेबाबत.
संदर्भः- आपले पत्र क्र.युएनआय/(८२/२१)/विशि-१/भाग-२/१३५२४,
दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी लसीचे दोन डोस घेतले आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता, कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी दिलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील जी वसतीगृहे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या ताब्यात आहेत व सुस्थितीत आहेत अशी वसतीगृहे सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यास अनुसरुन आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

आपला,

(अ.म.बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.